

करडई लागवडीसाठी योग्य वाणाची निवड करावी.

# करडई वाणांची वैशिष्ट्ये

डॉ. आदिनाथ ताकटे,
डॉ. अनिल राजगुरू

**कोरडवाहू क्षेत्रामध्ये रब्बी हंगामातील तेलबियाचे पीक म्हणजे करडई. हे पीक कमी पाण्यात येणारे व अवर्षणाचा ताण सहन करणारे पीक म्हणून ओळखले जाते. प्रतिकूल परिस्थितीत हे पीक तग धरते. कोरडवाहु क्षेत्रासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत करडई संशोधन प्रकल्प, सोलापूर येथून करडई पिकाचे विविध वाण प्रसारित करण्यात आले आहे.**

## भीमा

- प्रसारण वर्ष १९८२
- महाराष्ट्रातील कोरडवाहू क्षेत्रात लागवडीसाठी शिफारस
- पिकाचा कालावधी : १३० ते १३५ दिवस

**वैशिष्ट्ये**

- अवर्षणास प्रतिकारक
- मावा किडीस मध्यम प्रतिकारक
- मर रोगास मध्यम प्रतिकारक
- तेलाचे प्रमाण : २९ ते ३० टक्के
- फुलाचा रंग उमलताना पांढरा, वाळल्यानंतर फिक्कट पांढरा व मध्यभागी लालसर ठिपका.
- उत्पादकता : हेक्टरी १३ ते १५ क्विंटल

## फुले कुसुमा

- प्रसारण वर्ष २००३
- कोरडवाहू तसेच संरक्षित पाण्याखाली लागवडीस योग्य
- पिकाचा कालावधी : १३५ ते १४० दिवस

**वैशिष्ट्ये**

- मावा किडीस मध्यम प्रतिकारक
- फुलाचा रंग उमलताना पिवळा, वाळल्यानंतर लाल.
- तेलाचे प्रमाण ३० टक्के
- उत्पादकता (हेक्टरी) : कोरडवाहू १३ ते १५ क्विंटल, बागायती २० ते २२ क्विंटल

## एस.एस.एफ. ७०८

- प्रसारण वर्ष २०१०
- पश्चिम महाराष्ट्रासाठी, कोरडवाहू तसेच बागायती लागवडीस योग्य.

**वैशिष्ट्ये**

- मावा किडीस मध्यम प्रतिकारक
- फुलाचा रंग उमलताना पिवळा, वाळल्यानंतर लाल.
- तेलाचे प्रमाण ३१ टक्के
- पिकाचा कालावधी ११५ ते १२० दिवस
- उत्पादकता (हेक्टरी) : कोरडवाहू : १३ ते १५ क्विंटल, बागायती २० ते २२ क्विंटल

## फुले करडई (एस. एस. एफ. ७३३)

- प्रसारण वर्ष २०११
- कोरडवाहू लागवडीसाठी

**वैशिष्ट्ये**

- मावा किडीस मध्यम प्रतिकारक
- तेलाचे प्रमाण २९ टक्के
- फुलाचा रंग उमलताना पांढरा, वाळल्यानंतर फिक्कट पांढरा
- झाडांची उंची मध्यम
- पिकाचा कालावधी १२० ते १२५ दिवस
- उत्पादकता (हेक्टरी : कोरडवाहू १३ ते १५ क्विंटल

## एस. एस. एफ. ७४८ (फुले चंद्रभागा)

- प्रसारण वर्ष २०१२
- कोरडवाहू तसेच बागायती लागवडीसाठी

**वैशिष्ट्ये**

- तेलाचे प्रमाण २९ टक्के
- मावा किडीस मध्यम प्रतिकारक
- फुले उमलताना पिवळी, पडल्यानंतर लाल
- पिकाचा कालावधी १३० ते १४० दिवस
- उत्पादकता (हेक्टरी)
- कोरडवाहू १३ ते १५ क्विंटल, .
- बागायती २० ते २२ क्विंटल

**डॉ. अनिल राजगुरू, ९४२३३३५६३१, - डॉ. आदिनाथ ताकटे, ९४०४०३२३८९**
**(एकात्मिक शेती पद्धती संशोधन प्रकल्प, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)**